# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 07/09/2023 (गुरूवार) दुपार

---

## घरफोडी

**१) पो.स्टे. अरोली** :– अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील मौजा निमखेडा येथे दिनांक ०४/०९/२०२३ चे २०.०० वा. ते दिनांक ०५/०९/२०२३ चे १७.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– सचीन लिलाधर पाटील, रा. हिंगना ता. मौदा जि. नागपुर यांचे निमखेडा येथील पानठेल्यातील रात्री दरम्यान पानठेल्याचे कुलूप तोडून पानठेल्याचे ड्रावरमध्ये व गाडग्या मध्ये ठेवलेले एकुण ७०००/–रु. कोणीतरी अज्ञात इसमाने चोरुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक पोकळे पोस्टे अरोली मो. नं. ९८६०३५३१७९ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. सावनेर** :– अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील मौजा सुशील नगर एनके बार मागे मौजा वार्ड क्र. ४ सावनेर येथे दिनांक ०५/०९/२०२३ चे रात्री २२.०० वा. ते दिनांक ०६/०९/२०२३ चे सकाळी ०५.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– वसंतराव गुलाबराव कामडी, वय ५७ वर्ष रा. वार्ड क्र. ४ सावनेर यांनी रात्री मंदीराचे समोरील चॅनल गेटला लोखंडी कुलुप लावुन गेले व सकाळी येवुन पाहले असता दोन्ही दान पेटयाचे कुलुप तुटलेले दिसल्याने यावरून कोणीतरी अज्ञात चोराने मंदीराचे कुलुप तोडुन आत मंदीरात प्रवेश करून दोन्ही दान पेटयाचे कुलुप तोडुन दानपेटीतले अंदाजे रक्कम ६०००/–रू. कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार राजेश हावरे मो. नं. ९९२३३६५६२२ हे करीत आहे.

## चोरी

**पो.स्टे. नरखेड** :– अंतर्गत ०५ किमी अंतरावर मौजा बेलोना शिवार येथे दिनांक ०५/०६/२०२३ चे १८/०० वा. ते दि. ०६/०९/२०२३ चे ११/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– किशोर शंकरराव आरगुडे, वय ६२ वर्ष, रा. बेलोना ता. नरखेड यांचे शेतातील विहीरी मधील जुनी वापरती टेक्समो कंपनिची सिंगल हॉर्स पावरची पानबुडी मोटरपंप किंमती १०,०००/– रुपयाची पाईप व केबल कापुन कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार प्रेमराज सनेसर मो. नं. ९६७३४०४९९०७ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**